**GOVERNMENT VIDARBHA INSTITUTE OF SCIENCE AND HUMANITIES, AMRAVATI**
**(Autonomous Institute)**

# EXAMINATION CELL

**Email**: coegvishamravati@gmail.com **Contact No**: 0721-253-1705 **Website**: www.gvishexam

संदर्भ क्र. ३०४ दि. १६/१०/२०२३

## NEP आणि CBCS (B.A./ B.Sc./B.Sc. Home Science/ M.A./ M.Sc./ M.Sc. Home Science)

**(Regular & Backlog)**

## Winter 2023 परीक्षा आवेदन पत्र भरणे संबंधीच्या सूचना (Instructions).

1) विद्यार्थ्यांनी परीक्षा आवेदन पत्र भरण्यासाठी https://gvishamt.org या संकेतस्थळावर जाऊन योग्य तो परीक्षा अर्ज डाऊनलोड (Download) करावा आणि त्याची छापील प्रत काढून सदर अर्ज (दोन प्रतींमध्ये) स्व-हस्ते भरावा. सर्व परीक्षा अर्ज विद्यार्थ्यांना त्यांच्या विषयनिहाय WhatsApp ग्रुप वर उपलब्ध करून देण्यात येतील.

2) Regular आणि backlog (CBCS) या परीक्षांसाठी विद्यार्थ्यांनी दोन्ही अर्ज स्वतंत्रपणे भरावेत.

3) ऑफ-लाइन पद्धतीने परीक्षा अर्ज लिहताना वैयक्तिक व विषय-निहाय शैक्षणिक माहिती अचूकपणे नमूद करावी.

4) विद्यार्थ्यांनी संस्थेत / सत्र प्रवेश प्रक्रिया करताना निवडलेले विषय व परीक्षा अर्जात नमूद केलेले विषय एकच असावेत. विद्यार्थ्यांना प्रवेश प्रक्रिया करताना निवडलेल्या विषयांमध्ये दुरूस्ती करता येणार नाही. याकरिता विद्यार्थ्यांनी प्रवेश प्रक्रियेच्या वेळी प्राप्त झालेला लॉग-इन आयडी वापरून विषयांची पडताळणी करून घ्यावी. अन्यथा आवेदन पत्र स्वीकारले जाणार नाही.

5) विद्यार्थ्यांनी त्यांच्या अभ्यासक्रमात प्रयोगशाळा प्रात्यक्षिक कार्य विषय निवडले असतील तर सदर विषय परीक्षा अर्जात दिलेल्या चौकटी मध्ये नमूद करायचे आहे/ आहेत.

6) ऑफ-लाइन परीक्षा अर्ज भरताना नुकताच काढलेला फोटो दिलेल्या चौकटीत चिकटवायचा आहे.

7) UG (CBCS) सत्र-५ च्या विद्यार्थ्यांना निवडक (elective) विषय आहे. त्यांनी निवडलेला विषय परीक्षा अर्जामध्ये अचूकपणे नमूद करायचा आहे.+

8) परीक्षा अर्ज पूर्णपणे व अचूकपणे भरल्या नंतर विद्यार्थ्यांनी खालील प्रमाणे अर्ज सादर करण्याची प्रक्रिया करावी:

I. पदवी-पूर्व अभ्यासक्रमाच्या (B.A. व B.Sc.) विद्यार्थ्यांनी परीक्षा विभागातील (Examination Cell) पडताळणी समिती कडून परीक्षा अर्जाची पडताळणी व परीक्षा शुल्क निश्चिती करून घेणे व परीक्षा शुल्क संस्थेच्या कार्यालयातील शुल्क विभागामध्ये भरणे, व त्यानंतर परीक्षा अर्ज व परीक्षा शुल्क भरल्याच्या पावतीची छायाप्रत (photocopy) परीक्षा विभागात विहित वेळेत सादर करणे.

II. पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या (M.A./M.Sc.) च्या विद्यार्थ्यांनी त्यांच्या विभागांमध्ये परीक्षा अर्जाची पडताळणी व परीक्षा शुल्क निश्चिती करून घेणे व परीक्षा शुल्क संस्थेच्या कार्यालयातील शुल्क विभागामध्ये (Fees Section) भरणे, व त्यानंतर परीक्षा अर्ज व परीक्षा शुल्क भरल्याच्या पावतीची छायाप्रत (photocopy) त्यांच्या पदव्युत्तर विभागात विहित वेळेत सादर करणे.

III. विद्यार्थांनी परीक्षा आवेदन पत्रासोबत सादर करावयाची कागदपत्रे

a. दोन पासपोर्ट आकाराचे फोटो
b. परीक्षा अर्ज (दोन प्रती)
c. परीक्षा शुल्क भरल्याची पावतीची छायाप्रत
d. मागील परीक्षेची गुणपत्रिका ( Backlog करिता फक्त)

9) जे विद्यार्थी परीक्षा अर्ज सादर करण्याची उपरोक्त प्रक्रिया पूर्ण करणार नाहीत त्यांना परीक्षेला बसता येणार नाही याची विद्यार्थांनी नोंद घ्यावी.

10) परीक्षा शुल्क भरण्याचा कालावधी व परीक्षा शुल्क आकार खालील प्रमाणे राहील.

| **परीक्षा शुल्क आकार** | **Under Graduate (UG)** | **Post Graduate (PG)** |
|---|---|---|
| नियमित शुल्क | दि. १७/१०/२०२३ ते २५/१०/२०२३ | दि.२३/१०/२०२३ ते ३०/१०/२०२३ |
| नियमित शुल्क + रु. ५०विलंब शुल्क | दि. २६/१०/२०२३ ते ३०/१०/२०२३ | दि. ३१/१०/२०२३ ते ०३/११/२०२३ |
| नियमित शुल्क + विलंब शुल्क (रु.५०)+ रु.५० प्रतिदिन वाढीव विलंब शुल्क | दि. ३१/१०/२०२३ ते १०/११/२०२३ | दि. ०४/११/२०२३ ते १०/११/२०२३ |

11) दि. १०/११/२०२३ पर्यंत विद्यार्थ्यांनी सर्व परीक्षा आवेदन प्रक्रिया पूर्ण करणे अनिवार्य राहील. त्यानंतर परीक्षा आवेदन पत्र स्वीकार करणे अथवा अमान्य करणे हा निर्णय सर्वस्वीपणे मा. संचालक, शा.वि.ज्ञा. वि. संस्था, अमरावती यांच्या अखत्यारीत राहील.

**प्रा. अभिजित मेंढे**
प्रभारी परीक्षा नियंत्रक,
शासकीय विदर्भ ज्ञान विज्ञान
संस्था, अमरावती (स्वायत्त संस्था)

**डॉ. अंजली देशमुख**
संचालक,
शासकीय विदर्भ ज्ञान विज्ञान
संस्था, अमरावती (स्वायत्त संस्था)